| सोलापूर विद्यापीठ<br>**कुलसचिव कार्यालय** (पी. जी. प्रवेश विभाग)<br>सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव,<br>सोलापूर - ४१३ २५५<br>ईपीएबीक्स - ०२१७ -२७४४७७८ (११ लाईन्स)<br>विस्तृत क्र. ११५ फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०<br>संकेतस्थळ :<br>http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in<br>ई-मेल : registrar@sus.ac.in/<br>pgadmission@sus.ac.in | NAAC Accredited-2015<br>'B' Grade (CGPA 2.62) | **Solapur University**<br>**Registrar Office (PG Admission)**<br>Solapur-Pune National Highway, Kegaon,<br>Solapur-413 255<br>EPABX No. 0217- 2744778 (11 lines)<br>Ext. No. 115. Fax No.0217-2744770<br>Website :<br>http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in<br>E-mail : registrar@sus.ac.in /<br>pgadmission@sus.ac.in |
|---|---|---|

सोविसो/पी.जी.प्रवेश/कॅप्रप/२०१७ / 3666 दिनांक 5 JUN 2017

**अति महत्वाचे सुधारीत नियमावली**

**प्रति,**
मा.प्राचार्य/प्राचार्या,
प्रस्तुत विद्यापीठ सोलापूर शहरातील सर्व बी.ए. बी.कॉम, व बी.एस्सी महाविद्यालय,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय-** केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या नियमावली बाबत.

**महोदय/ महोदया,**

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सोलापूर शहरामधील बी.ए., बी.कॉम.,बी.एस्सी व बी.एस्सी बायोटेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाचे सर्व महाविद्यालयातील प्रथम वर्षाचे प्रवेश केंद्रीय पध्दतीने करण्यात येत असून सदर केंद्रीय प्रवेश प्रक्रिया नियमावलीनुसार पार पाडावयाची आहे (सोबत नियमावली जोडली आहे.).

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेबाबत काही महत्वाच्या सुचना खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. | ज्या संस्थेची कनिष्ठ महाविद्यालय आहेत अशा महाविद्यालयांनी एकूण प्रवेश क्षमतेच्या ८०% जागेवर त्या संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन स्तरावर दिनांक २२ जून, २०१७ पर्यंत प्रवेश द्यावेत. |
| २. | केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमधून किती विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचे आहेत याची प्रवर्गनिहाय माहिती परिशिष्ट अ व ब प्रमाणे संबंधित महाविद्यालयांनी दिनांक २२ जून, २०१७ (दुपारी ३. ००) पर्यंत विद्यापीठास कळविणे बंधनकारक आहे. |
| ३. | केंद्रीय प्रवेश प्रक्रियेची माहिती पुस्तिका, जाहिरात देणे, पहिली , दुसरी व तिसरी गुणवत्ता यादी इत्यादी तारखांचा तपशिल खालीलप्रमाणे राहिल. |

| अ.नं. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज भरण्याचा सुरूवातीचा दिनांक | दिनांक १५ जून, २०१७ |
| २ | ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २१ जून, २०१७ |
| ३ | ऑनलॉइन फी भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २३ जून, २०१७ |
| ४ | महाविद्यालय व प्रवर्गनिहाय पहिली गुणवत्ता यादी दिनांक (अनुदानित) | दिनांक ३० जून, २०१७ (सकाळी-११.०० वा.) |
| ५ | पहिली गुणवत्ता यादी लागल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक (अनुदानित) | दिनांक ४ जुलै, २०१७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ६ | दुसरी गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक (अनुदानित) | दिनांक १० जुलै, २०१७ (सकाळी-११.०० वा.) |
| | ७ | दुसरी गुणवत्ता यादी लागल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक (अनुदानित) | दिनांक १४ जुलै, २०१७ |
| | ८ | तिसरी व अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक (विनाअनुदानित) | दिनांक १८ जुलै, २०१७ (सकाळी-११.०० वा.) |
| | ९ | तिसरी गुणवत्ता यादी लागल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक (अनुदानित व विनाअनुदानित) | दिनांक २२ जुलै, २०१७ |
| ४. | तिसरी फेरीनंतर जर महाविद्यालयात रिक्त जागा असतील तर त्यांनी ऑनलाईन अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांनांच प्रवेश महाविद्यालयस्तरावर देण्यात यावेत. | | |
| ५. | प्रत्येक प्रवेश फेरीमधून रिक्त राहीलेल्या जागाची व प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची प्रवर्गनिहाय माहिती महाविद्यालयाने प्रत्येक प्रवेश फेरीनंतर दर दोन दिवसात दुपारी ३.०० वा. पर्यंत विद्यापीठास कळविणे बंधनकारक आहे. | | |

वरील प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता प्रवेशासंदर्भात योग्य ती कार्यवाही आपल्या महाविद्यालयानी स्तरावरून दिलेल्या विहित मुदतीमध्ये वेळेत पूर्ण करावे आणि ज्या सुचना विद्यार्थ्यांना देण्याबाबत निर्णय झाला आहे अशा बाबी देखील आपल्यास्तरावरून संबंधित विद्यार्थ्यांच्या निर्देशनास आणून देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. पी. प्रभाकर)
प्र.कुलसचिव

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# सोलापूर विद्यापीठ,सोलापूर

## (पी.जी.प्रवेश विभाग)

| शै.वर्ष २०१६-१७ पासून सोलापूर शहरातील बी.ए. बी.कॉम., बी.एस्सी व बी.एस्सी बायोटेक्नॉलॉजी या पदवी वर्गातील प्रथम वर्ष प्रवेशाची नियमावली | |
|---|---|
| १ | ज्या संस्थेची कनिष्ठ महाविद्यालय आहेत अशा महाविद्यालयांनी एकूण प्रवेश क्षमतेच्या ८०% जागेवर त्या संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन स्तरावर प्रवेश द्यावेत. |
| २ | ज्या संस्थेची कनिष्ठ महाविद्यालय आहेत अशा महाविद्यालयाच्या प्रवेश क्षमतेच्या एकूण २०% किंवा महाविद्यालय विद्यापीठास प्रदान करतील तेवढया जागेवर प्रवेश विद्यापीठ स्तरावर केंद्रीय प्रवेश पध्दतीने करण्यात येतील. |
| ३ | ज्या संस्थेची कनिष्ठ महाविद्यालय नाहीत अशा महाविद्यालयांचे सर्व प्रवेश विद्यापीठ स्तरावर केंद्रीय प्रवेश पध्दतीने करण्यात येतील. |
| ४ | जे महाविद्यालय अल्पसंख्याक आहेत अशा महाविद्यालयांचे प्रवेश क्षमतेच्या एकूण ५०% टक्के इतक्या जागेचे किंवा महाविद्यालय विद्यापीठास प्रदान करतील तेवढया जागेचे प्रवेश विद्यापीठ स्तरावर केंद्रीय पध्दतीने करण्यात येतील. |
| ५ | केंद्रीय प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यास रु.१००/- इतके शुल्क आकारण्यात येईल सदरचे शुल्क नेटबँकिंग, डेबीट /क्रेडिट कार्ड अशा स्वरुपात स्विकारण्यात येईल. |
| ६ | तात्पुरत्या तुकडयांचे प्रवेश सुध्दा अनुदानित तुकडयाच्या रिक्त जागा भरल्यानंतर केंद्रिय प्रवेश पध्दतीने करण्यात यावेत. |
| ७ | केंद्रिय पध्दतीने प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू असताना एखादया महाविद्यालयातील एखादया विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द झाल्यास केंद्रिय प्रवेश प्रक्रियेने प्राधान्याने भरण्यात यावी. रिक्त जागा विद्यापीठास कळविणे महाविद्यालयास बंधन कारक राहील. |
| ८ | केंद्रिय पध्दतीने प्रवेश देण्याची प्रक्रिया संपल्यानंतर एखाद्या विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द झाल्यास त्या संबंधित महाविद्यालयाने महाविद्यालयीन स्तरावर प्रवेश द्यावा. |
| ९ | केंद्रिय पध्दतीने विद्यार्थ्यांने एखादया विद्याशाखेसाठी एखादया महाविद्यालयात प्रवेश घेतला असल्यास व त्याला तो रद्द करावयाचा असल्यास संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करून त्याच विद्याशाखेत त्याच अभ्यासक्रमास शहरातील इतर महाविद्यालयात प्रवेश घेता येणार नाही. |
| १० | ऑनलाईन अर्ज भरताना अर्जामध्ये अनुदानित तुकडया आणि विनाअनुदानित तुकडया याच्यासाठी वेगळा कोड नमुद करण्यात यावा . |
| ११ | ऑनलाईन अर्ज भरताना विद्यार्थ्याने महाविद्यालयाचे प्राधान्य क्रमांकानुसार सर्व महाविद्यालयाचे कोड नमूद करणे बंधनकारक राहील. |
| १२ | अनुदानित व विनाअनुदानित तुकडयांचे शैक्षणिक व इतर एकूण शुल्क ऑनलाईन पोर्टलवर व माहिती पुस्तिकामध्ये नमूद करण्यात यावेत. |
| १३ | एकापेक्षा जास्त अभ्यासक्रमास प्रवेशासाठी आवेदन पत्र सादर करावयाचे असेल तर त्या विद्यार्थ्यांस प्रत्येक अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र आवेदन पत्र सादर करावे लागेल व प्रत्येक आवेदन पत्रास १००/- इतके शुल्क आकारण्यात येईल. |
| १४ | केंद्रीय प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांने महाविद्यालयाची माहिती पुस्तिका खरेदी करुन संबंधित महाविद्यालयाचे योग्य ते शुल्क भरुन प्रवेश घ्यावा. |

| | |
|---|---|
| १५ | प्रत्येक महाविद्यालयाने Technical Person आणि Admission Incharge नेमावा व त्याचे नाव, संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी विद्यापीठास (पी.जी.प्रवेश विभाग) कळवावे. |
| १६ | बारावी परीक्षेस समान गुण असणारे एकापेक्षा जास्त विद्यार्थी असतील तर त्या विद्यार्थ्यांचे १० वीचे गुण पाहावेत. १० वीचे गुण समान असतील तर जन्मतारीख पहावी. जन्मतारीख सारखी असल्यास विद्यार्थ्याचा पत्ता पाहावा व त्यानुसार नजीकच्या महाविद्यालयामध्ये प्राधान्य देण्यात यावे. |
| १७ | विद्यार्थ्याने अर्जामध्ये नमूद केलेल्या महाविद्यालयाच्या नावाच्या विकल्पानुसार, आरक्षण व प्रवेशाची क्षमता इ. बाबीचा विचार करुन महाविद्यालयानिहाय गुणवत्ता यादी तयार करुन एम.के.सी.एल. पुणे यांच्याकडून प्रसिध्द करण्यात येणार आहे. |
| १८ अ | शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पूर्वी ज्या विद्यार्थ्यांनी पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे व अनुत्तीर्ण झाल्या कारणाने व इतर कारणास्तव विद्यार्थी पुर्न:प्रवेश घेण्यास इच्छुक आहे अशा विद्यार्थ्यांनी पूर्व प्रवेशित महाविद्यालयामार्फत विद्यापीठाकडून आपला प्रवेश व संपादणुक (Performance) रद्द करून घेणे आवश्यक आहे. |
| १८ ब | कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतून प्रथम प्रयत्नात बारावी उत्तीर्ण ही शैक्षणिक पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश देऊन जर जागा उपलब्ध असतील तर खालील प्रमाणे नमुद केलेल्या विद्यार्थ्यांच्या एकत्रित गुणवता यादी तयार करून प्रवेश देण्यात यावे. i) D.Ed. ii) MCVC iii) १७ नंबरचा अर्ज भरून १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी iv) १२ वी समकक्ष इतर शैक्षणिक पात्रता v) कला वाणिज्य व विज्ञान या शाखेतून एकापेक्षा जास्त संधी घेऊन उत्तीर्ण झालेला |
| १९ | शहरातील सर्व महाविद्यालयातील अनुदानित तुकडयाचे प्रवेश पूर्ण झाल्यानंतरच विनाअनुदानित तुकडयांचे प्रवेश देण्यात यावेत. |
| २० | स्पॉट प्रवेश फेरीमध्ये मूळ कागदपत्रे असल्याशिवाय प्रवेश देवू नये तसेच सदर विद्यार्थ्याने दुस-या महाविद्यालयात प्रवेश न घेतल्याबदलची खात्री करण्यात यावी. |

SOLAPUR UNIVERSITY SOLAPUR

## परिशिष्ट - "अ"

**महाविद्यालयाच्या एकूण प्रवेश क्षमतेच्या ८०% कोटयामधील विद्यापीठास केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकरिता प्रदान करावयाच्या जागांचा तपशिल**

| | |
|---|---|
| १. महाविद्यालयाचे नाव :- | २. अभ्यासक्रमाचे नाव :- |
| ३. एकूण प्रवेश क्षमता :- | ४. प्रवेश क्षमतेपैकी ८०% जागा :- |
| ५. तुकडी :- अनुदानित / विनाअनुदानित | ६. विद्यापीठास प्रदान करावयाच्या जागा (८०% पैकी ):- |

| महाविद्यालयाने ८०% कोटयामधून विद्यापीठास प्रदान करावयाच्या जागा | सामाजिक आरक्षण / समांतर आरक्षण | खुला (OPEN) | अनुसूचित जाती (SC) | अनुसूचित जमाती (ST) | विमुक्त जाती व भटक्या जमाती | | | | इतर मागास वर्गीय (OBC) / विशेष मागास वर्ग (SBC) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | विमुक्त जाती (VJ-A) | भटक्या जमाती (NT- B) | भटक्या जमाती (NT-C) | भटक्या जमाती (NT-D) | |
| | | 50% | 13% | 7% | 3% | 2.5% | 3.5% | 2% | 19% |
| | अनारक्षित | | | | | | | | |
| | महिला ३०% | | | | | | | | |
| | आजी/माजी सैनिक ५% | | | | | | | | |
| | अपंग ३ % | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | |

SOLAPUR UNIVERSITY SOLAPUR

## परिशिष्ट - "ब"

एकूण प्रवेश क्षमतेच्या ८०% कोटयामधील महाविद्यालय स्तरावर देण्यात आलेले प्रवेश संख्या

| | |
|---|---|
| १. महाविद्यालयाचे नाव :- | २. अभ्यासक्रमाचे नाव :- |
| ३. एकूण प्रवेश क्षमता :- | ४. प्रवेश क्षमतेपैकी ८०% जागा :- |
| ५. तुकडी :- अनुदानित / विनाअनुदानित | ६. महाविद्यालय स्तरावर प्रवेश देण्यात आलेली संख्या:- |

| महाविद्यालयाने ८०% कोटयातून प्रवेश दिलेली संख्या | सामाजिक आरक्षण / समांतर आरक्षण | खुला (OPEN) | अनुसूचित जाती (SC) | अनुसूचित जमाती (ST) | विमुक्त जाती व भटक्या जमाती | | | | इतर मागास वर्गीय (OBC) / विशेष मागास वर्ग (SBC) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | विमुक्त जाती (VJ-A) | भटक्या जमाती (NT- B) | भटक्या जमाती (NT-C) | भटक्या जमाती (NT-D) | |
| | | 50% | 13% | 7% | 3% | 2.5% | 3.5% | 2% | 19% |
| | अनारक्षित | | | | | | | | |
| | महिला ३०% | | | | | | | | |
| | आजी/माजी सैनिक ५% | | | | | | | | |
| | अपंग ३ % | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | |

SOLAPUR UNIVERSITY SOLAPUR